दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन,
२७, ब. भ. मार्ग, फोर्ट,
मुंबई-४०० ०२३.
दि. ४।६।१३

प्रति,
उपसंचालक,
तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र शासन,
विभागीय कार्यालय, अमरावती,
जिल्हा अमरावती.

विषयः बुलढाणा जिल्हा गॅझेटिअर प्रकाशन
तंत्र शिक्षण संस्थाचो माहिती.

महोदय,

जिल्हा गॅझेटिअर हा ज्ञानकोशसदृश ग्रंथ असून त्यामध्ये जिल्ह्याचा, भूगोल, इतिहास, अर्थव्यवस्था, प्रशासन, आर्थिक विकास, लोक, व त्यांची संस्कृती, प्रेक्षणीय स्थळांची सखोल माहिती दिलेली असते दर्शनिका विभाग हे महाराष्ट्र शासनाच्या एका विभाग प्रमुखाचे कार्यालय असून सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे. संकल्पित ६०० पृष्ठांच्या या ग्रंथात "शिक्षण" या विषयावर सविस्तर माहिती देण्यात येईल शासनाच्या धोरणानुसार ही माहिती देण्यात येईल त्यात तंत्र शिक्षणाच्या विकासाचा आद्येत वस्तुनिष्ठ इतिहास देण्यात येईल शासनाच्या धोरणानुसार ही माहिती विविध शासकीय कार्यालयाकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. तरी खाली नमूद केलेल्या मुद्दयांवर सविस्तर माहिती आपल्या कार्यालयाकडून अपेक्षित आहे.

२. खालील मुद्दयावरील माहिती अत्यावश्यक आहे.

१) जिल्ह्यातील तंत्र शिक्षणाचा इतिहास व विकास यात जिल्ह्यातील पहिल्या शिक्षण संस्थेचे नाव पत्ता व स्थापनेचे वर्ष याचा उल्लेख करावा. त्याशिवाय संस्थेमध्ये दिले जाणारे शिक्षण अभ्यासक्रमाचे नाव विद्यार्थी व शिक्षकांची संख्या.

२) जिल्ह्यातील तंत्र शिक्षण देणाऱ्या सर्व (पदवी व पदविका) शासकीय खजगी संस्था व त्यांची नावे पत्ते व स्थापनेचे वर्षे अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी संख्या तसेच शिक्षक संख्या (१९८०, १९८५, १९९०, १९९५, १९९५, १९९९, २००५, २०१० व २०१२-१२ वर्षाकरीता)

३) जिल्ह्यातील व्यवसायीक शिक्षणाचा इतिहास व विकास यात सर्व व्यावसायीक शिक्षण संस्थेची नावे स्थापनावर्षे शिक्षक व विद्याथी संख्या. (१९८०, १९८५, १९९०, १९९५, १९९९, २०००५, २०१० व २०१२-२०१२ वर्षाकरीता)

४) जिल्ह्यातील औद्यागीक प्रशिक्षण संस्था यात सर्व संस्थांची नावे स्थापना वर्षे शिक्षक व विद्यार्थी संख्या व्यवसायानुसार दयावी. (वर्षे १९८०, १९८५, १९९०, १९९५, २००५, २०१० व २०१२, २०१२ वर्षाकरीता)

५) जिल्ह्यातील तांत्रिक, माध्यमिक शाळा, पहिली संस्था स्थापन झाल्याचे वर्षे नाव शिक्षक व विद्यार्थी संख्या.

६) जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची नावे व सुरु झाल्याचे वर्षे,अभ्यासक्रमानुसार,विद्यार्थी संख्या व शिक्षक संख्या

७) जिल्ह्यातील तंत्र शिक्षण विषयक नवीन योजनांची माहिती.

उपरोक्त मुद्याशिवाय आपल्या कार्यालयाने तयार केलेले सर्वेक्षण अहवाल अथवा पुस्तिका यांच्या प्रती पाठविण्यात याव्यात.

३. जिल्हा गॅझेटिअर हा अभ्यासपूर्ण शासकीय ग्रंथ असल्याने त्यात प्रसिध्द करावयाची माहिती विस्तृत व वस्तुनिष्ठ असायला हवी. ही बाब लक्षात घेवून माहिती पाठविण्यात यावी.

४. बुलढाणा जिल्हा गॅझेटिअरचे काम अग्रक्रमाने पूर्ण करावयाचे असल्याने ही माहिती २०११ पर्यंतची अध्यवत दयावयाची असल्यामुळे एक महिन्याच्या आत पाठविण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला,

कार्यकारी संपादक व सचिव

सहसंचालक, तंत्र शिक्षण,

---

सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती
जा.क्र. विकाअ/शिक्षण/गॅझेटिअर/२०१३/ ९६७०
दिनांक :- १६/०६/२०१३.

प्रति,

प्राचार्य,
शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित
अभियांत्रिकी पदवी व पदविका संस्था.
बुलढाणा जिल्हा.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने विचारण्यात आलेल्या मुद्दयाबाबतची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

S D Paschat
सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.